# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)

बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५, वीर नरीमन रोड-४०० ००१

दूरध्वनी क्रमांक – २२०४ ४१८६, २२०४ ७१५७, फॅक्स : (०२२) २२८३५८८१

E mail ID - mktgprod@charmodyog.in


---

- **स्थापना :**

**महाराष्ट्र** चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना १ मे, १९७४ रोजी कंपनी कायदा, १९५६च्या अंतर्गत करण्यात आलेली असून, शासनाच्या दि.२.१.२००३ च्या निर्णयानुसार आता या महामंडळाचे नांव **संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित** असे करण्यात आले आहे. सदरचे महामंडळ अनुसूचित जातीतील चर्मकार समाज व त्यांच्या पोटजाती उदा.चांभार, ढोर, होलार, मोची इत्यादी यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास करून त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी स्थापन झाले आहे.श्

शासन निर्णय क्र.चविम १०९५/(६४६१)/उद्योग-५, दिनांक २४.६.१९९६ अन्वये दिलेल्या आदेशानुसार महामंडळाचे संपूर्ण प्रशासकीय नियंत्रण उदयोग व कामगार विभागाकडून समाजकल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे :**

**१. राज्यात चर्मोद्योगाचा विकास.**
**२. अनुसूचित जातीमधील चर्मोद्योगातील कारागिरांचा विकास करणे.**
**३. चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसीत करणे.**
**४. चर्मवस्तूंसाठी बाजारपेठेची निर्मिती.**
**५. चर्मोद्योगास प्रोत्साहन देणे.**
**६. राज्यातील चर्मोद्योग विकासासाठी चालना देणे.**

- **महामंडळाचे भाग भांडवल ( मार्च, २०१४ अखेर)**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **अधिकृत भाग भांडवल** | **रु. ७३.२१ कोटी** |
| **२.** | **वितरीत भाग भांडवल** | **रु.२८१.२१ कोटी** |
| **३.** | **अधिकृत भाग भांडवल वाढीचा प्रस्ताव** | **रु.३००.०० कोटी** |

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

## महामंडळाची प्रशासकीय रचना

**व्यवस्थापकीय संचालक**

↓

| | | | |
|---|---|---|---|
| वित्तीय सल्लागार<br>मुख्य लेखाधिकारी | व्यवस्थापक<br>प्रशासन | व्यवस्थापक<br>उत्पादन विक्री | व्यवस्थापक<br>विकास/सेवा |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| सहव्यवस्थापक | सहव्यवस्थापक | ↓ | ↓ |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| उपव्यवस्थापक | उपव्यवस्थापक | उपव्यवस्थापक | ↓ |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| सहाय्यक व्यवस्थापक | सहाय्यक व्यवस्थापक | सहाय्यक व्यवस्थापक | सहाय्यक व्यवस्थापक |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| रोखपाल | लघुलेखक | ↓ | ↓ |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| कार्यालयीन सहाय्यक | वाहन चालक | ↓ | ↓ |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| शिपाई | शिपाई | शिपाई | शिपाई |

| | | |
|---|---|---|
| विक्री केंद्र | उत्पादन केंद्र | |
| ↓ | ↓ | विभागीय स्तर |
| विक्री केंद्र प्रमुख | केंद्र प्रमुख | विभागीय अधिकारी |
| ↓ | ↓ | लेखापाल/ कार्यालयीन सहाय्यक |
| विक्रेता | ↓ | ↓ |
| | लेखापाल | जिल्हा स्तर |
| | ↓ | जिल्हा व्यवस्थापक |
| | भांडारपाल | ↓ |
| | ↓ | लेखापाल |
| | तांत्रिक पर्यवेक्षक | ↓ |
| | ↓ | वसुली निरीक्षक |
| | कुशल/अकुशल कामगार | |

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

## माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहिती देण्यासाठी नियुक्त केलेले अधिकारी

## प्रधान कार्यालय, मुंबई.

**अपिलीय अधिकारी** :- व्यवस्थापकीय संचालक

**जनमाहिती अधिकारी**

१) लेखा विभाग :- वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी

२) उत्पादन/विक्री विभाग :- व्यवस्थापक (उत्पादन/विक्री)

३) विकास विभाग :- व्यवस्थापक (विकास)

४) सेवा विभाग :- व्यवस्थापक (सेवा)

५) प्रशासन विभाग :- व्यवस्थापक (प्रशासन)

### विभागीय कार्यालय

अपिलीय अधिकारी :- व्यवस्थापक (विकास) मुंबई.

जन माहिती अधिकारी :- विभागीय अधिकारी

### जिल्हा कार्यालय

अपिलीय अधिकारी :- विभागीय अधिकारी

जन माहिती अधिकारी :- जिल्हा व्यवस्थापक

### उत्पादन केंद्र

अपिलीय अधिकारी :- व्यवस्थापक(उत्पादन/विक्री),मुंबई.

जन माहिती अधिकारी :- उत्पादन केंद्र प्रमुख

### विक्री केंद्र

अपिलीय अधिकारी :- व्यवस्थापक (उत्पादन/विक्री), मुंबई.

**जन** माहिती अधिकारी :- विक्री केंद्र प्रमुख.

# उत्पादन व विक्री विभाग

- **उत्पादन केंद्रे -** महामंडळाची दर्यापूर, हिंगोली, कोल्हापूर व सातारा येथे उत्पादन केंद्रे आहेत.

| ठिकाण | उत्पादन क्षमता | प्रत्यक्ष उत्पादन | उत्पादित मालाचा तपशील |
|---|---|---|---|
| सातारा | १०००० किलो | ६००० किलो | प्रेस सोल,बॅग टॅन, बी.जी.लेदर चामडे उत्पादन |
| कोल्हापूर | २०००० जोडया | ९२४२ जोडया | कोल्हापूरी चप्पल व क्रोम फोल्डींग चप्पलचे उत्पादन |
| दर्यापूर | १००००० जोडया | ७११५८ जोडया | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज सेफ्टी शूज, फॅन्सी शूज उत्पादन,जेन्टस चप्पल,लेडीज चप्पल |
| हिंगोली | ५०००० जोडया<br>१२००० नग | ३७४६३ जोडया<br>३५०० नग | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज सेफ्टी शूज, फॅन्सी शूज आणि कंडक्टर कॅश बॅग व ऑफीस बॅग उत्पादन, जेन्टस चप्पल,लेडीज चप्पल |

- **विक्री केंद्रे** :- या महामंडळाची धुळे, जळगांव, सोलापूर, नांदेड, वाशी, बांद्रा येथे विक्री केंद्रे असून येथे महामंडळात उत्पादन केलेल्या मालाची विक्री करण्यात येते.

- **बाजारपेठ :-** महामंडळाच्या उत्पादन केंद्रात उत्पादित शुज व चर्मवस्तुंचा पुरवठा हा शासकीय व निमशासकीय विभागांना करण्यात येतो.

## अ) महामंडळामार्फत राबविण्यं ात येणाऱ्या राज्य शासनाच्या योजना :-

### १. ५० टक्के अनुदान योजना :-

**चर्मकार** समाजाच्या कुटुंबातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु.५०,०००/- पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणा-या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थ सहाय्य दिले जाते. या अर्थ सहाय्यापैकी रु.१०,०००/- कमाल मर्यादेपर्यन्त ५० टक्के कर्जाची रक्कम महामंडळ अनुदान म्हणून देते. उर्वरित ५० टक्के कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अथवा बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यांत बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणा-या कर्जावर द.सा.द.शे. ९.५ ते १२.५ टक्के दराने व्याज आकारले जाते.

### २. बीज भांडवल योजना :-

रु.५०,००१/- ते रु.५,००,०००/- पर्यत प्रकल्प गुंतवणूक असणा-या कोणत्याही योजनेसाठी बीज भांडवल योजने अंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या व्याज दराने उपलब्ध करण्यांत येतो. या योजने अंतर्गत रु.५०,००१/- पासून ते रु.५,००,०००/- पर्यतचा कर्ज पुरवठा द.सा.द.शे. ९.५ ते १२.५ टक्के व्याज दराने बँकेमार्फत करण्यांत येतो. या योजने अंतर्गत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रक्कमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वत:चा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. त्या रक्कमेपैकी रु.१०,०००/- अनुदान म्हणून देण्यात येतात तर उर्वरित रक्कम ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यांत येते. या योजनेअंतर्गत मिळणा-या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बँकेस व महामंडळास ३६ ते ६० मासिक समान हप्त्यांत एकाचवेळी करावयाची असते.

### ३. प्रशिक्षण योजना :-

चर्मकार समाजाच्या लाभधारकांना व्यवसायासाठी लागणारे तात्रींक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधीत तांत्रीक व्यवसाय सुरु करण्यासाठी विविध व्यावसायीक ट्रेडचे शासन मान्यताप्राप्त संस्थेमार्फत (३ ते ६ महिन्याच्या कालावधी पर्यंत) मोफत प्रशिक्षण देण्यात येते. तसेच मोफत प्रशिक्षणा व्यतिरिक्त प्रशिक्षणार्थीस दरमहा रु.३००/- ते ४००/- पर्यंत विद्यावेतन देण्यांत येते.
१.शिवणकला २.ब्युटीपार्लर, ३.इलेक्ट्रीक वायरमन, ४.टर्नर / फिटर, ५.मशीनवर स्वेटर विणणे , ६.खेळणी बनविणे, ७.टी.व्ही./रेडीओ/टेपरेकॉर्डर मेकॅनिक, ८.संगणक प्रशिक्षण, ९.मोटार वाईन्डींग, १०.फेब्रीकेटर / वेल्डींग, ११.ऑटोमोबाईल रिपेअरींग (टु व्हीलर, थ्री व्हीलर, फोर व्हीलर), १२.वाहनचालक (मोटार ड्रायव्हिंग) १३.चर्मोद्योग पादत्राण उत्पादन, १४.चर्मोद्योग चर्मवस्तु उत्पादन.

## ब) महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या केंद्र शासनाच्या योजना -

- **राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली), यांच्या योजना –**

### 1. मुदती कर्ज योजना :-

सदर योजने अंतर्गत विविध व्यवसायं ाकरीता एन.एस.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचे मार्फत रु.१ ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना मुदती कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी. नवी दिल्ली यांचा सहभाग ७५ टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु.दहा हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. तसेच वेगवेगळ्या वाहनासाठीची कर्ज मर्यादा वेगवेगळी आहे.

### 2. सुक्ष्म पत पुरवठा योजना :-

या योजने अंतर्गत चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याज दराने रु.२५,०००/- ते रु.५०,०००/- पर्यंत कर्ज दिले जाते. त्यापैकी रु.१०,०००/- इतके अनुदान दिले जाते.

### 3. महिला समृध्दी योजना :-

चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता निराधार अशा महिला लाभार्थींसाठी महिला समृध्दी योजने अंतर्गत ४ टक्के व्याज दराने रु.२५,०००/- ते रु.५०,०००/- पर्यंत कर्ज देण्यांत येते. त्यापैंकी रु.१०,०००/-अनुदान म्हणून दिले जाते.

### 4. महिला किसान योजना :-

या योजने अंतर्गत ज्या महिलांच्या नावांवर शेत जमिनीचा ७/१२ उतारा आहे किंवा पती-पत्नी या दोघांच्या नावावर ७/१२ उतारा आहे. अथवा पतीच्या नावांवर ७/१२ चा उतारा आहे व त्या महिला लाभार्थीचा पती प्रतिज्ञा पत्राद्वारे आपल्या पत्नीस शेतीपूरक व्यवसायासाठी या शेतजमिनीच्या नांवे कर्ज मंजूर करुन घेण्यास तयार असेल अशा महिला लाभार्थीस रु.५०,०००/- कर्ज स्वरुपात ५ टक्के व्याज दराने कर्ज देण्यात येते. त्यापैंकी रु.१०,०००/- अनुदान म्हणून दिले जाते.

### 5. शैक्षणिक कर्ज योजना :-

या योजने अंतर्गत चर्मकार समाजातील विदयार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता "शैक्षणिक कर्ज योजना" सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून कार्यान्वीत करण्यांत आलेली आहे. भारतामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांस रु.१०.०० लाख व परदेशात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यास रु.२०.०० लाख पर्यंत कर्ज घेण्याची मर्यादा आहे. याकरीता लाभार्थ्यांच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थीचा ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहे

त्यांचेकडून शैक्षणिक खर्चाबाबतचा अंदाजपत्रक घेण्यात येते. या कर्जावर ४ टक्के व्याजदर आकारण्यात येतो. सदर कर्जाची परतफेड लाभार्थी नोकरीस लागल्यानंतर त्याच्या पगारातून करण्यात येते.

### 6. <u>नारी आर्थिक सशक्तीकरण योजना (NASY) :-</u>

एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांनी दि. ८.२.२०१४ पासून नविन योजना 'नारी आर्थिक सशक्तीकरण योजना' कार्यान्वित केलेली आहे. या योजने अंतर्गत विधवा, घटस्फोटित, निराधार व वय २५ ते ५० वर्ष आहे. अशा महिलांना कुटुंब चालविण्यासाठी लागणरे उत्पन्न मिळावे व समाजात त्यांना वेगळे स्थान निर्माण व्हावे यासाठी सदरच्या योजनेअंतर्गत रु १ ते २ लाखापर्यंत ४ टक्के व्याजदराने कर्ज देण्यात येते.

### 7. <u>व्होकेशनल एज्युकेशन ॲण्ड ट्रेनिंग लोन योजना (VETLS) :-</u>

एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांनी दि.८.२.२०१४ पासून नविन योजना व्होकेशनल एज्युकेशन ॲण्ड ट्रेनिंग लोन स्किम कार्यान्वित केलेली आहे. या योजनेअंतर्गत अध्ययन अभ्यासक्रम व प्रशिक्षण कालावधी ६ महिन्यापासून ते २ वर्षापर्यंत असून ४ टक्के व्याजदराने रु.१ ते १.५० लाखापर्यंत कर्ज देण्यात येते.

- **<u>महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनामधून आर्थिक लाभ मिळण्यास सर्वसाधारणपणे आवश्यक असणाऱ्या प्राथमिक बाबी :-</u>**

1. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.
2. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
3. अर्जदाराच्या वयाची अट १८ ते ५० वर्षे अशी आहे.
4. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव त्याला असावा.
5. **अ)** अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एन.एस.एफ.डी.सी योजनेसाठी ग्रामीण भागासाठी रु.८१,०००/- व शहरी भागासाठी रु.१,०३,०००/- पर्यंत असावे व राज्य शासनाच्या योजनेसाठी ग्रामीण व शहरी भागासाठी रु. १,००,०००/- पर्यंत असावे.
   **ब)** प्रशिक्षण योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-या अर्जदाराच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे असावे.
6. जातीचा व उत्पन्नाचा दाखला तहसिलदार किंवा तत्सम सक्षम प्राधिका-याने दिलेला असावा.
7. अर्जदाराने या महामंडळाकडून अथवा इतर कोणत्याही शासकीय उपक्रमाकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा.
8. महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्ती अर्जदारावर बंधनकारक राहतील.

- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

1. अर्जदाराचा जातीचा दाखला (सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेतलेला असावा).
2. अर्जदाराच्या कुटूंबाचा उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांचेकडून घेतलेला असावा).
3. नुकत्याच काढलेल्या पासपोर्ट साईजचे तीन फोटो.
4. रेशन कार्डाच्या झेरॉक्स प्रती.
5. अर्जदाराचा शैक्षणिक दाखला.
6. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेचा उपलब्धतेबाबतचा पुरावा.
7. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेची भाडेपावती, करारपत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा.
8. एन.एस.एफ.डी.सी. योजनेखाली वाहन खरेदी करण्यासाठी ड्रायव्हींग लायसन्स व आर.टी.ओ. कडे परवाना इत्यादी.
9. वाहन खरेदीसाठी वाहनाच्या बुकींगबद्दल / किंमतीबाबत अधिकृत विक्रेता / कंपनीकडील दरपत्रक.
10. अर्जदारास व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र.
11. व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला.
12. व्यवसायासंबंधी प्रकल्प अहवाल व खरेदी करावयाच्या मालमत्तेच्या साहित्याचे दरपत्रक.
13. दोन सक्षम जामीननदार आवश्यक आहेत (सरकारी नोकरदार अथवा मालमत्ताधारक).

- **व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळण्याकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

1. अर्जाचा नमुना महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात विनाशुल्क स्वरुपात उपलब्ध असेल.
2. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज भरुन संपूर्ण कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करावयाचा आहे.

- **अर्ज प्राप्त झाल्यावर महामंडळामार्फत करावयाची कार्यवाही :-**

1. जिल्हा कार्यालयात विशेष केंद्रीय अर्थ सहाय्य योजना व बीजभांडवल योजनेखालील अर्ज प्राप्त झ ाल्यानंतर जिल्हा व्यवस्थापक, अर्जासोबत जोडलेल्या संपूर्ण कागदपत्रांची छाननी करुन व आवश्यक त्या कर्ज प्रकरणात प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या लाभार्थी निवड समितीने मंजूरी दिल्यानंतर स्थानिक सेवा क्षेत्रात येणा-या राष्ट्रीयकृत बॅकेस मंजूरीसाठी शिफारस करतात.

2. तसेच जिल्हा कार्यालयात एन.एस.एफ.डी.सी. योजने अंतर्गत अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा व्यवस्थापक रीतसर त्या प्रकरणांची नोंद करुन कागदपत्रांची छाननी करुन व प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या लाभार्थी निवड समितीने मंजूरी दिल्यानंतर स्पष्ट अभिप्रायासह प्रादेशिक कार्यालयाकडे तो अर्ज पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करतात.

3. प्रादेशिक कार्यालयामार्फत जिल्हावार कर्ज प्रकरणांची नोंद करुन अर्जासोबत पाठविण्यात आलेल्या कागदपत्रं ाची शहानिशा करण्यात येते व कर्ज प्रकरणांची मुख्य कार्यालयाकडे शिफारस करण्यात येते.

4. मुख्यालयात संबंधीत शाखेत प्रादेशिक कार्यालयाकडून व्यवसायनिहाय आलेल्या कर्ज प्रकरणांची नोंद घेतली जाते व कर्ज प्रकरणांची छाननी करुन **निधी उपलब्धतेनुसार व जेष्ठता क्रमांकानुसार** मंजुरी प्रदान केली जाते.

## • महामंडळाची विभागीय व जिल्हा कार्यालये –

१. **विभागीय अधिकारी,कोकण**
**जिल्हा व्यवस्थापक, मंुबई शहर**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
गव्हर्नमेंट लेदर वर्कींग स्कूल कंपाऊंड
खेरवाडी बांद्रा (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

२. **जिल्हा व्यवस्थापक, मंुबई उपनगर**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
गव्हर्नमेंट लेदर वर्कींग स्कूल कंपाऊंड
खेरवाडी बांद्रा (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

**३. जिल्हा व्यवस्थापक, ठाणे**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
कलेक्टर ऑफिस कंपाऊन्ड
जिल्हाधिकारी कार्यालय, गेट नं. १ जवळ
कोर्ट नाका, ठाणे (प.)

४. **जिल्हा व्यवस्थापक, रायगड**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
तळमजला,रुम नं.२,रायगड जिल्हा परिषद शाळेच्या मागे,
गोंघळपाडा,अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१

**५. जिल्हा व्यवस्थापक, रत्नागिरी**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
कुवारबाब, रत्नागिरी
जि. रत्नागिरी ४१५ ६१२

**६. जिल्हा व्यवस्थापक, सिंधुदूर्ग**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
ए विंग, तळमजला, सिंधुदुर्ग नगरी,
ओरस (बु) ता.कुडाळ,
जिल्हा सिंधुदुर्ग – ४१६ ८१२

**७. विभागीय अधिकारी/ जिल्हा व्यवस्थापक, नाशिक**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
नासडी पुलाजवळ, नाशिक पुणे रोड
जि. नाशिक

**८. जिल्हा व्यवस्थापक, अहमदनगर**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
वसुंधरा अपार्टमेंट, भिस्त बाग,
पाईपलाईन रोड, अहमदनगर

**९. जिल्हा व्यवस्थापक, धुळे**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
पाला बाझार, मोगलाई खाजी रोड, धुळे
जि. धुळे ४२४ ००१

**१० जिल्हा व्यवस्थापक, नंदुरबार**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
टोकर तलाव रोड, नंदुरबार
जि. नंदुरबार

**११ जिल्हा व्यवस्थापक, जळगांव**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जळगांव

महाबळ रोड, महावळ
ता. जि. जळगांव

१२ **विभागीय अधिकारी / जिल्हा व्यवस्थापक, पुणे**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
४२४, मंगळवार पेठ,
लडकत पेट्रोलपंपा शेजारी,
जि. पुणे ४११ ०११

१३ **जिल्हा व्यवस्थापक, कोल्हापूर**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
कावळा नाका,विचारे माळ,
डॉ बाबर हॉस्पिटल जवळ,
कोल्हापूर ४१६ ००३.

१४ **जिल्हा व्यवस्थापक, सांगली**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
जुना बुधवगाव रोड, रेल्वे क्रासींग जवळ
जि. सांगली

**१५ जिल्हा व्यवस्थापक, सातारा**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
चर्म संशोधन केंद्र, सातारा १९८ मल्हारपेठ, लिडकॉम,
जि. सातारा ४१५ ००२

१६ **जिल्हा व्यवस्थापक, सोलापूर**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
सातरस्ता सोलापूर
जि. सोलापूर ४३१ ००१

१७ **विभागीय अधिकारी / जिल्हा व्यवस्थापक, औरंगाबाद**
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
प्लॉट नं. १७०, सावरकरनगर,

एन – ५, दक्षिण सिडको,
जि. औरंगाबाद ४३१००१

१८ **जिल्हा व्यवस्थापक, बीड**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
तळ मजला, शासकीय विश्रामगृहा जवळ
बीड ४३१ १२२

१९ **जिल्हा व्यवस्थापक, जालना**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
इमारत क्र. ३
जि. जालना ४३१ २०३

२० **जिल्हा व्यवस्थापक, लातूर**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
कोटगीरे निवास, घ.नं. आर – १/३०९५/२
नरहरे क्लास जवळ, प्रकाश नगर (पूर्व)
बार्शी रोड, जि. लातूर ४१३ ५३१

**२१ जिल्हा व्यवस्थापक, नांदेड**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
घ. न.१-१२-८४९, गोरे निवास, रविदा
लाल बहादुर शास्त्री रोड,
जि. नांदेड

**२२ जिल्हा व्यवस्थापक, उस्मानाबाद**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
व्दारा वसंत भिमराव मडके यांचे घर, राज कॉम्पलेक्स
२८/१८३४ आनंद नगर पोलीस लाईन समोर
येडशी रोड,
जि. उस्मानाबाद

**२३ जिल्हा व्यवस्थापक, परभणी**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
जायकवाडी वसाहत कारेगांव रोड
जि. परभणी ४३१ ४०१

**२४ जिल्हा व्यवस्थापक, हिंगोली**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
सेंट्रल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डींग ( रुम नं. ९ )
तळ मजला, महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळा जवळ
कलेक्टर ऑफिस, नांदेड रोड, हिंगोली – ४३१ ५१३

**२५ विभागीय अधिकारी / जिल्हा व्यवस्थापक, अमरावती**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. डी.जी.थोटे, एल.आय.जी. ८/४ माल टेकडी रोड, टोपे नगर
एस.एस.सी. बोर्ड अमरावती
जि. अमरावती ४४४ ६०२

**२६ जिल्हा व्यवस्थापक, अकोला**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
व्दारा सौ. सुमन रा. इंगळे, केडीया प्लॉट, इंडियन बँकेच्या मागे
श्रीकृष्ण ज्ञान मंदिराजवळ, अकोला
जि. अकोला ४४४ ००१

**२७ जिल्हा व्यवस्थापक, बुलढाणा**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
तळमजला, चिखळी रोड,
जि. बुलढाणा

**२८ जिल्हा व्यवस्थापक, यवतमाळ**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
यवतमाळ जि. यवतमाळ ४४५ ००१

**२९ जिल्हा व्यवस्थापक, वाशिम**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
नवीन इमारत, नालंदा नगर ,
सिव्हील लाईन, चिरवळी रोड
जि. वाशिम

**३० विभागीय अधिकारी/ जिल्हा व्यवस्थापक, नागपूर**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
समाज कल्याण संकुल, आंबेडकर पुतळयाच्या मागे
रिझर्व बँक चौक, नागपूर ४४० ००१.

३१ **जिल्हा व्यवस्थापक, वर्धा**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
२ रा मजला, सेवाग्राम रोड,
जि. वर्धा ४४२ ००१

**३२ जिल्हा व्यवस्थापक, चंद्रपूर**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
जलनगर, रय्यतवारी रोड, आर.टी.ओ ऑफिसजवळ
जि. चंद्रपूर ४४२४०१

**३३ जिल्हा व्यवस्थापक, गोंदिया**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
पतंगा मैदान, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ
गोदिंया ४४१६०१

३४ **जिल्हा व्यवस्थापक, भंडारा**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
सिव्हिल लाईन
जि. भंडारा ४४१ ९०४

३५ **जिल्हा व्यवस्थापक, गडचिरोली**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन
सरकारी आय टी आयच्या मागे
मूळ रोड, गडचिरोली ४४२ ६०५

- **उत्पादन केंद्रे –**

१) **अमरावती - संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित**
पादत्राण उत्पादन केंद्र, गणेशपूर,
ता. दर्यापूर,जि.अमरावती ४४४८०३.

२) **हिंगोली- संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित**
पादत्राण उत्पादन केंद्र, सी/५, औढा रोड,एम.आय.डी.सी.,
लिंबाळा,जि.हिंगोली ४३१५१३

३) **कोल्हापूर- संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित**
पादत्राण उत्पादन केंद्र,२९०७,बी,
सुभाष नगर, जि.कोल्हापूर ४१६२१८

४) **सातारा- संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित**
चर्म संशोधन केंद्र, १९८, मल्हार पेठ,
जि.सातारा ४१५००२

- **विक्री केंद्रे –**

१) **बांद्रा -** गव्हर्नमेंट लेदर वर्कींग स्कुल कंपांऊड, खेरवाडी, बांद्रा, मुंबई-५१

२) **वाशी -** १०/एफ-१, आदिती अपार्टमेंट, सेक्टर-९, जुहूनगर, वाशी, नवी मुंबई ४००७०१

**३) धुळे -** बारा पत्थर,दुकान नं.१४,ए.बी., जिल्हा- धुळे ४२४००१

**४) जळगांव -** १६, जिल्हा स्टेडियम कॉम्प्लेक्स, स्टेट बँक ऑफ इंडिया समोर,जळगांव ४२५००१

**५) सोलापूर -** गाळा नं.६, हुतात्मा स्मृती मंदिर, शॉपिंग सेंटर, सोलापूर ४१३००१

**६) नांदेड -** गोदावरी हॉटेल कॉम्प्लेक्स, दुकान नं. १२, कॉलेज रोड,नांदेड ४३१६०१